आमचे राज्य आल्यावर मा. आडवाणीजी गृहमंत्री झाले. त्यांना विषय सांगताच त्यांनी पावले उचलायला सुरुवात केली. पण त्यातच पुन्हा मध्यावधी निवडणुका होणार हे स्पष्ट झाले. मा. आडवाणीजींना देश पिंजून काढावा लागणार. त्यांचे काम थोडे हलके करण्यासाठी म्हणून शेवटच्या काही महिन्यांसाठी माझ्याकडे गृह खात्याचे राज्यमंत्रीपदही देण्यात आले. तात्काळ मी दादरा-नगरहवेली प्रकरण पूर्ण केले. कै. सुधीर फडके, बाबासाहेब पुरंदरे यांसारख्या असामी या स्वातंत्र्य संग्रामात होत्या. त्या सर्वांना पुण्यात एका भव्य कार्यक्रमात मानपत्रे देण्यात आली.

नियोजन राज्यमंत्री म्हणून याच काळात नववी पंचवार्षिक योजनाही विधीवत मान्य करवली, तर कार्यक्रम अंमलबजावणी मंत्री म्हणून खासदार निधी एक कोटी वरुन दोन कोटी पर्यंत वाढविला. याच काळात माझ्या मतदार संघात तारापूर येथील 1,080 मेगॅवॅट अणु ऊर्जा प्रकल्पाचा माझ्या हस्ते शुभारंभ झाला. देशहितासाठी येथील गावक-यांनी सहजतेने या प्रकल्पाला मान्यता दिली. त्यावेळी त्यांचे उचित पुनर्वसन करण्याचा मी मनोमन संकल्प केला. राज्यमंत्री म्हणून केलेल्या कामाची एका राष्ट्रीय सर्वेक्षण संस्थेने पोच दिली. 1999 च्या निवडणुकांपूर्वी परिणामकारकता, प्रामाणिकता व साधेपणा असे निकष वापरुन या संस्थेने मंत्र्यांची वर्गवारी केली. यात पंतप्रधान श्री. अटलजी पहिल्या क्रमांकावर, तर मी दुस-या क्रमांकावर होतो.

### पेट्रोलियम मंत्रीपद

पुन्हा एकदा मध्यावधी निवडणुका होऊन 1999 मध्ये श्री. अटलजी पुन्हा पंतप्रधान बनले. विजयी होऊन मी दिल्लीला गेलो. विमानतळावर पोचलो तो अटलजींनी यावेळीही मला आपल्या मंत्रीमंडळात स्थान दिले असून केवळ कॅबिनेट मंत्री अशी बढती नव्हे, तर पेट्रोलियमसारखे महत्त्वाचे खाते मोठ्या विश्वासाने सोपविल्याचे समजले. हे मंत्रीपदही अनेकांना धक्का देऊन गेले. पेट्रोलियम क्षेत्रातील मातब्बर व्यावसायिक हा मंत्री ठरवतात असा एक समज दिल्लीत आहे. माझ्यासारखा हाय-फाय नसलेला, संघाचे दुटांगी धोतर नेसणारा एवढ्या महत्त्वाच्या खात्याचा मंत्री व्हावा, तेही जागतिकीकरणाचे वारे वाहत असताना याचे अनेकांना आश्चर्य वाटले. अटलजींनी हे खाते देऊन जणू मला मातृभूमिचे ऋण फेडायची एक संधी दिली. मी माझ्यापरीने या संधीचे सोने केले. मी मंत्री झालो तेव्हा कोट्यावधी नागरिक गॅस जोडणीसाठी प्रतिक्षेत होते. नोंदणी असलेल्यांना सिलिंडर वेळेवर मिळत नव्हता. काळ्याबाजाराला उत आला होता. मी ही प्रतिक्षा यादी संपवून मागेल त्याला गॅस ही स्थिती वर्षभरात निर्माण केली. मुंबई, दिल्ली या शहरांमध्ये प्रदूषणाला आळा बसावा म्हणून वाहनांसाठी सीएनजी गॅस मोठ्या प्रमाणावर उपलब्ध केला. पाईप गॅसचे जाळे विणायला सुरुवात केली. आपला देश गॅस व पेट्रोलियम उत्पादनांबाबत त्यावेळी 70 टक्के परदेशावर अवलंबून होता. हे परावलंबित्व कमी करण्यासाठी ठिकठिकाणी उत्खननाचे काम हाती घेतले. त्यातूनच कृष्णा - गोदावरीच्या खो-यात मोठ्या प्रमाणात नैसर्गिक वायूचा शोध लागला, तर राजस्थानमध्ये बारमेर क्षेत्रात कच्च्या तेलाचे साठे हाती आले. रशिया आणि सुदान या दोन देशात कच्च्या तेलाच्या उत्खननामध्ये गुंतवणूक केली. पेट्रोलियम मंत्री म्हणून केलेल्या दोन कामांचे मला अतीव समाधान आहे. इथेनॉलची निर्मिती करुन ते पेट्रोलमध्ये मिसळण्याचा निर्णय मी घेतला व अंमलातही आणला. यामुळे पेट्रोलियम क्षेत्राचा लाभ झालाच, पण त्याचवेळी ऊस उत्पादक शेतक-यांसाठी ही तो वरदान ठरला आहे. याच काळात कारगिलचे युद्ध झाले. या युद्धातील हुतात्मांच्या वीर पत्नी किंवा कुटुंबियांना सरकारी खर्चाने पेट्रोलपंप किंवा गॅस एजन्सी देण्याचा निर्णय हा मनाला आजन्म समाधान देतो आहे. देशाचे ऋण फेडायला याहून अधिक मी काय करु शकलो असतो? पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायु मंत्रालय स्वतंत्रपणे 1963 मध्ये स्थापन झाले. तेव्हांपासून आतापर्यंत सलग पाच वर्षे काम केलेला एकमेव पेट्रोलियम मंत्री असा विक्रमही माझ्या नावावर नोंदला गेला याचा मला सार्थ अभिमान आहे.

माझ्या या कारकिर्दीत एका गोष्टीबाबत माझ्यावर हेतुपूर्वक सतत टीका होत होती. प्रसार माध्यमे, विरोधक आणि काही आपली वाटणारी मंडळीही यात होती. जागतिकीकरणाच्या नावाखाली नवरत्न म्हणून ओळखल्या जाणा-या, देशाचा कोट्यावधी रुपयांचा फायदा करुन देणा-या तेलकंपन्यांचे खाजगीकरण करावे यासाठी माझ्यावर अनेकांनी दबाव आणला, टीका केली. काहींच्या टीकास्त्राचे व्रण तर न मिटण्यासारखे होते. परंतु मी माझ्या भूमिकेवर ठाम होतो. पेट्रोल अत्यावश्यक आहे, युद्ध परिस्थितीत याचे वितरण खाजगी कंपन्यांकडे असल्यामुळे जी झळ पोहोचली त्यामुळेच तर इंदिरा गांधींनी या मूळ खाजगी कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण केले होते. शिवाय खाजगीकरणात हजारो कर्मचारी बेकार होण्याची स्पष्ट लक्षणे दिसत होती. म्हणूनच मी या गोष्टीला सतत नकार दिला. हा माझा निर्णय बरोबर की चूक हे कदाचित काळच ठरवेल. देशहिताच्या दृष्टीने जे योग्य वाटले ते मी करु शकलो याचे समाधान मात्र नक्कीच आहे. देशकार्याचे जे स्वप्न उरी बाळगून राजकारणात उतरलो ते ब-याच अंशी पूर्ण करु शकलो.

### अनपेक्षित पराभव

सलगपणे मुंबईतून पाच वेळा लोकसभा निवडणुका जिंकल्याचा विक्रम माझ्या नावावर नोंदविला गेला असतानाही 2004 च्या निवडणुकीत मला अनपेक्षितपणे पराभवाला सामोरे जावे लागले. केलेल्या कामांमुळे कार्यकर्त्यांना विजयाची पूर्ण खात्री होती. हा अतिविश्वास नडला की खरोखरच चित्रपटसृष्टीची मतदारांवर आजही जादू आहे, असा प्रश्न निर्माण होऊन चित्रपट नायक गोविंदा विजयी झाले. पराभव माझा झाला, पण अक्षरशः हजारो हळहळले. आजही अपरिचित माणूस भेटल्यावर या पराभवाबद्दल खंत व्यक्त करतो. पद हे जनसेवेचे एक माध्यम होते. लक्ष्य नव्हे. त्यामुळे ''चुनाव हारा हूँ, हारी नहीं है हिम्मत। जनसेवा का व्रत, चलता रहेगा अविरत'' असा संकल्प करुन काम करीतच राहिलो.

लोकसभेत नसलो, तरी प्रश्न सोडवायला मनाई थोडीच आहे. पक्ष संघटनही आहेच. सतत काम करण्याचे जणू व्यसनच जडले आहे.